नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८४ Issue - 84 | वार रविवार दि. १० ऑगस्ट २०२५३ Blow- Sunday Date 10 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ३३४ राजकीय पक्षांना दाखवला घरचा रस्ता

### निवडणूक आयोगाची मोठी कारवाई; देशातील नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना देशातील नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याची मोठी कारवाई शनिवारी केली. आयोगाच्या या निर्णयानंतर आता फक्त ६ राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक आणि २,५२० नोंदणीकृत मान्यता असलेले राजकीय पक्ष देशात आहेत. तथापि आयोगाने यादीतून वगळलेल्या राजकीय पक्षांना अपील करण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिली आहे. राष्ट्रीय ६ पक्षांमध्ये भाजप आणि काँग्रेस व्यतिरिक्त आम आदमी पक्ष, बसप, माकप आणि एनपीपी यांचा समावेश आहे. आयोगाच्या यादीनुसार देशात समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल यांसारखे ६७ पक्ष प्रादेशिक पक्ष म्हणून नोंदणीकृत




आहेत.

आयोगाने म्हटले आहे की, यादीतून वगळलेले राजकीय पक्ष लोकप्रतिनिधी कायदा-१९५१ च्या कलम २९ ब आणि कलम २९ क च्या तरतुदींसह आयकर कायदा-१९६१ आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश-१९६८ च्या संबंधित तरतुदींनुसार राजकीय पक्षांना मिळणारे कोणतेही लाभ मिळविण्यास पात्र राहणार नाहीत.

यावर्षी जूनमध्ये निवडणूक आयोगाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना ३४५ मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची पडताळणी प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या प्रक्रियेअंतर्गत, अधिकाऱ्यांनी या पक्षांची चौकशी केली, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आणि वैयक्तिक सुनावणीद्वारे त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली. नंतर सबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे ३४५ पैकी ३३४ राजकीय पक्षांना अटींचे पालन न केल्याबद्दल आपल्या यादीतून काढून टाकले आहे.

भारतीय निवडणूक आयोगाच्या लोकप्रतिनिधीत्व कायदा-१९५१ च्या कलम २९अ अंतर्गत आयोगाच्या या कारवाईनंतरही देशात मान्यताप्राप्त नसलेल्या २८५४ पक्षांपैकी २,५२० राजकीय पक्ष शिल्लक आहेत.

भारतात राजकीय पक्षांच्या नोंदणीबाबतच्या नियमानुसार, एखादा पक्ष सलग ६ वर्षे निवडणूक लढवत नसेल तर त्याचे नाव नोंदणी यादीतून काढून टाकले जाते. कलम २९अ अंतर्गत नोंदणीच्या वेळी, राजकीय पक्षांना त्यांचे नाव, पत्ता, पदाधिकाऱ्यांची यादी इत्यादी माहिती द्यावी लागते आणि त्यात काही बदल झाल्यास, आयोगाला तात्काळ कळवावे लागते. आणि मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची नोंदणी केली जाते.

## दिल्लीला पावसाचा तडाखा, भिंत कोसळल्याने आठ जणांचा करुण अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत मुसळधार पावसामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास हरिनगर मध्ये ५० फूट भिंत कोसळली आहे. यामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला आहे, यात दोन महिलांचा आणि दोन तरुणींचा समावेश आहे. अग्निशमनचे पथक घटनास्थळी पोहोचले असून बचावकार्य सुरु आहे.

जैतपूर पोलिस ठाण्याअंतर्गत येणार्या हरिनगरमधील बाबा मोहन राम मंदिराजवळ ही दुर्घटना घडली. समाधी स्थळाची भिंत कोसळल्याने अनेकजण ढिगाऱ्याखाली दबले गेले. ज्या सर्वच आठ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन पुरुष, दोन महिला, दोन तरुणी आणि एक मुलाचा समावेश आहे. यामध्ये मुलगा हसीबुल हा गंभीर जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण त्याचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

दिल्ली अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले ढिगाऱ्याखाली दबलेल्या सर्व आठ जणांचा मृत्यू झाला आहे. शबीबूल (वय ३०), रबीबूल (वय ३०) मुत्तू अली (वय ४५) तीन पुरुष, रुबिना (वय २५) डॉली (वय २५) या दोन महिला, रुखसाना (वय ६) हसीना (वय ७) आणि मुलगा हसीबुल हे सर्वजण दगावले आहेत.

जैतपूर पोलीस स्टेशन परिसरात, शनिवारी सकाळी ०९.३० च्या सुमारास, हरी नगर गावाच्या मागील झोपडपट्टीवर एका समाधीस्थळाची भिंत कोसळल्याची दुर्घटना घडली. दोन मुलांसह आठ जण ढिगाऱ्याखाली अडकले होते. त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेनंतर अग्निशमन विभाग घटनास्थळी दाखल झाले होते. पावसामुळे बचाव कार्य अडचणीचे बनले होते. पण अखेर सर्वांना बाहेर काढण्यात आले, पण दुर्दैवाने कोणीच बचावले नाही.

राजधानी दिल्लीत शनिवारी सकाळी झालेल्या पावसामुळे अनेक परिसर जलमय झाले आहेत. तसेच वाहतूकही ठप्प झाली आहे. ज्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. रक्षाबंधनाच्या दिवशीही नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. आयटीओ, लक्ष्मी नगर, कॅनॉट प्लेससह अनेक भागांत गुडघ्याएवढे पाणी साचले आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुन्हा एकदा रेड अलर्ट जारी केला आहे.

## अजित पवारांकडून तीन महापालिकांची घोषणा, पण मुख्यमंत्र्यांनी दादांचा दावा खोडला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे आणि परिसराचा वाढता पसारा लक्षात घेता नव्याने महापालिका स्थापन करण्याची मागणी सातत्याने केली जात असताना, त्यावरून आता राज्य सरकारमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याचे चित्र शुक्रवारी पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात तीन महापालिकांची गरज असल्याचे जाहीर केले असताना, मुख्यमंत्र्यांनी पवार यांचा दावा फेटाळून, नव्याने केवळ एका महापालिकेची गरज असल्याचे नमूद केले. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरासाठी नक्की एक महापालिका होणार की तीन महापालिका होणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.



महापालिकेच्या हद्दीत ३२ गावांचा समावेश झाल्यानंतर बृहन्मुंबई महापालिकेपेक्षा पुणे महापालिकेची हद्द मोठी झाली. तेव्हापासून महापालिकेचे विभाजन करून नव्याने महापालिका निर्माण करण्याची मागणी होत आहे. पुण्याप्रमाणे पिंपरी-चिंचवड महापालिकेलगतच्या नागरीकरण वाढल्याने तेथेही नव्याने आणखी एक महापालिका स्थापन केली जावी, असा आग्रह धरला जात आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सकाळी चाकण परिसराची पाहणी केली, त्या वेळी पुण्यासाठी नव्याने तीन महापालिकांची गरज अधोरेखित केली. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मात्र नव्या तीन महापालिकांचा पवार यांचा दावा खोडून काढला. सध्या पुणे जिल्ह्यात दोन महापालिका अस्तित्वात असून त्याशिवाय आणखी एक महापालिका गरजेची आहे, असेच पवार यांना म्हणायचे असावे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

मांजरी, फुरसुंगी, उरळी देवाची या भागात एक महापालिका, चाकण भागात एक आणि हिंजवडी भागात एक महापालिका करावी लागणार आहे. तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार असल्याचं अजित पवार म्हणाले होते.

स्वतंत्र महापालिका स्थापनेचा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे वाढत्या नागरीकरणाच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी एकच केंद्र निर्माण होईल; परंतु यासंदर्भात नागरिकांना विश्वासात घ्यावे लागेल. साधकबाधक चर्चा करावी लागेल. अस्तित्वात असलेल्या महापालिकांचे प्रश्न आणि हद्दवाढीतील गावांची परिस्थिती याबाबत अभ्यास करावा लागेल. स्वतंत्र पालिका स्थापनेचे महत्त्व लोकांना पटवून दिल्यास ते निश्चितपणे साथ देतील, असं खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे म्हणाले.

## २६ लाख लाडक्या बहिणींची होणार चौकशी; घरोघरी जावून घेणार शोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु होण्यास आता एक वर्ष पूर्ण झालं आहे. राज्य सरकारकडून गेल्या वर्षभरापासून १ कोटी पेक्षा जास्त महिलांना या योजनेच्या माध्यमांतून दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. पण विधानसभा निवडणुकीनंतर या योजनेचे निकष तपासले जात आहेत. यामध्ये लाखो महिला या अपात्र असल्याचं समोर आलं आहे. आतादेखील राज्यातील २६ लाख महिला या अपात्र असल्याची माहिती समोर आली आहे. या महिलांची आता चौकशी होणार आहे. यासाठी सरकार घरोघरी जावून या महिलांचा शोध घेणार आहे.

विशेष म्हणजे रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात नुकताच जुलै महिन्याचा हप्ता जमा झाला आहे. पण आता लाडक्या बहिणींची चिंता वाढवणारी बातमी आहे. कारण राज्य सरकार आता राज्यातील तब्बल २६ लाख लाडक्या बहिणींची चौकशी होणार आहे. राज्यातील २६ लाख महिलांच्या घरी जावून चौकशी केली जाणार आहे.

महिला बालकल्याण विभागाचं जिल्हा प्रशासनाला पत्र






लाडकी बहीण योजनेसाठी विविध निकष ठेवण्यात आले होते. त्या निकषांच्या आधारे लाभार्थी महिलांनी अर्ज दाखल केला होता. आता सरकार घरोघरी जावून लाभार्थी महिलांचे अर्ज आणि पात्रता तपासणार आहे. विशेष म्हणजे लाभार्थी महिलांची चौकशी करण्यासाठी महिला बालकल्याण विभागाकडून जिल्हा प्रशासनाला आदेश देण्यात आला आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला आदेशाचं पत्र देण्यात आलं आहे.

जिल्हा पातळीवरील महिला आणि बालकल्याण विभागाच्या अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून ही अपात्र लाभार्थी महिला शोधण्याची मोहीम आता सुरु करण्यात आली आहे.

लाडकी बहीण योजनेत एकाच घरातील दोन पेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. मात्र दोन पेक्षा जास्त आणि २१ ते ६५ वर्षे वयोगटात न बसणाऱ्या तब्बल २६ लाख महिलांना या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली होती. या महिलांची यादी महिला आणि बालकल्याण विभागाने तयार केली आहे. अंगणवाडी सेविका असलेल्या एका महिलेने याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

दोन प्रकारचे निकष सांगितले आहेत. वयोमर्यादा बरोबर आहेत, बोगस कागदपत्रे भरले आहेत का, अशा प्रकारची तपासणी करा. त्यांचा निर्गम उतारा पाहा, टीसी पाहा, अशा प्रकारची तपासणी करा. घरातील तीन महिला असतील तर दोघांना पात्र करा आणि एकीला अपात्र करा. टॅक्सधारक, वाहनधारक, चारचाकी आहे का, याची तपासणी करा. चारचाकीचा नंबर बघा. याबाबत घरोघरी जावून चौकशी करा, असा आदेश दिला आहे, अशी प्रतिक्रिया एका अंगणावाडी सेविकेने दिली.

**ऑपरेशन सिंदूरवरुन वायूदल प्रमुखांचा मोठा खुलासा**

**भारताचा पाकिस्तानवर एअर स्ट्राईक**

## पाकिस्तानचे पाच फायटर जेट पाडले, ३०० किमीवरुन लक्ष्यभेद केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानचे नेमके किती नुकसान केले असा प्रश्न सातत्याने विचारला जातो. त्यावर आता खुद्द वायूदल प्रमुखांनीच उत्तर दिलं. भारतीय वायूसेनेने (खत्र) 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानच्या ५ लढाऊ विमानांसह एका मोठ्या विमानाचा नाश केल्याची माहिती एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी दिली. हा हल्ला पाकिस्तानच्या हद्दीत तब्बल ३०० किलोमीटर अंतरावरून करण्यात आला. जमिनीपासून ते आकाशात करण्यात आलेला हा हल्ला म्हणजे भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विक्रम ठरल्याचं अमर प्रीत सिंह म्हणाले.

बंगळुरुतील एअर चीफ मार्शल एल. एम. कात्रे मेमोरियल लेक्चरच्या १६व्या सत्राला संबोधित करताना अमर प्रीत सिंह यांनी पाकिस्तानला दिलेल्या या मोठ्या धक्क्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विशिष्ट गुप्तचर माहितीच्या आधारे पाकिस्तानातील थउ हँगरवर हल्ला करण्यात आला. या हँगरमध्ये देखभालीसाठी ठेवलेली एफ-१६





लढाऊ विमाने तसेच एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम (थउड) होते.

वायूदल प्रमुखांनी सांगितले की, हवाई क्षेत्रावरील हल्ल्याचा निर्णय अत्यंत अचूक गुप्त माहितीनुसार घेतला गेला. मुख्य इमारतीवरही हल्ला करण्यात आला, जी काही वेळा नागरी टर्मिनल म्हणूनही वापरली जात होती. आम्ही लहानपणापासून अशा दिवसांची स्वप्ने पाहिली होती. निवृत्तीपूर्वीच मला हे साध्य करण्याची संधी मिळाली.

'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानच्या हवाई क्षमतेला मोठा धक्का बसला असून, तज्ज्ञांच्या मते हा भारताच्या वायूसेनेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी आणि रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाचा हल्ला ठरला आहे.

भारताने ७ मे रोजी पाकिस्तानविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले होते, ज्यामध्ये पीओके आणि पाकिस्तानातील नऊ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली. भारतीय सैन्याच्या या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले होते. ही कारवाई पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात करण्यात आली होती, ज्यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि लष्कर प्रमुख आसिम मुनीर यांनी दावा केला होता की पाक सैन्याने भारताचे अनेक फायटर जेट्स पाडले आणि त्यांना पाकिस्तानमधून पळून जाण्यास भाग पाडले. मात्र नंतर त्यांनी आपल्या विधानावरून पलटी घेतली आणि म्हटले की भारताचे फायटर जेट्स आमच्या सीमेत शिरलेच नव्हते.

# जागतिक सिंह दिनः निसर्ग, मानव आणि सिंह यांच्यात सुसंवादाची गरज!

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात '९ ऑगस्ट क्रांती दिन' निमित्त व्याख्यान संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधन समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने '९ ऑगस्ट क्रांती दिन' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब बळवंत होते. या प्रसंगी मंचावर कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे, शास्त्र विभागाचे उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. समाधान माने आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापक प्रबोधन समितीचे चेअरमन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. सुरुवातीला कर्मवीर भाऊराव पाटील व रयतमाऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

विशेष व्याख्यानात प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा यांनी सांगितले की, ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावरील काँग्रेस बैठकीत महात्मा गांधींनी 'करो या मरो'चा नारा दिला, आणि यानंतर 'भारत छोडो' आंदोलनाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात पुरुष, महिला व मुलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. ब्रिटिश साम्राज्याविरुद्धची ही लढाई भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील निर्णायक टप्पा ठरली. त्यांनी महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग, असहकार यांसारख्या निशस्त्र आंदोलनांचा व दुसऱ्या महायुद्धातील भारताच्या भूमिकेचा उल्लेख केला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बळवंत यांनी 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील विविध ऐतिहासिक घटनांचा आढावा घेत क्रांती दिनाचे विशेष महत्त्व अधोरेखित केले.'

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके यांनी केले तर आभार प्रा. मयूर चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक-प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निसर्ग आणि मानव यांचा संबंध अत्यंत गुंतागुंतीचा आणि संवेदनशील आहे. प्रत्येक प्राणी आणि माणूस आपल्या अस्तित्वासाठी स्वार्थी असतो, हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. सिंह, हिरण, ससा किंवा मानव - सर्वजण त्यांच्या गरजेनुसार जगतात आणि संघर्ष करतात. त्यामुळे माणसावर दोष देणे किंवा त्याला जबाबदार ठरवणे सोपे असले तरी, ही बाब इतकी साधी नाही.

भारतामध्ये सिंह संरक्षणासाठी मोठा आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक खर्च केला जातो. उदाहरणार्थ, एका सिंहासाठी सरासरी *३२ लाख रुपये* वार्षिक खर्च केला जातो. हा खर्च फक्त सिंहांच्या संरक्षणासाठी नसून, जैवविविधता टिकविणे, पर्यावरणीय संतुलन राखणे आणि मानवी-सामाजिक ताळमेळ सांभाळणे यासाठी आहे. मात्र, अनेक वेळा सामान्य जनतेला किंवा समाजाला हा खर्च 'फक्त खर्च' वाटतो आणि त्यावर प्रश्न उपस्थित होतात.

सिंह हा जंगलातील सुपर प्रीडेटर (वरिष्ठ शिकारी) आहे. तो जंगलातील इतर प्राण्यांच्या संख्या नियंत्रित करून नैसर्गिक ताळमेळ राखतो. जर सिंह नसेल, तर हिरण, ससा, आणि इतर वन्य प्राण्यांची संख्या प्रचंड वाढू शकते, ज्यामुळे वनस्पतींचे मोठे नुकसान होऊ शकते. परिणामी निसर्गाचा ताळमेळ बिघडतो. अशा परिस्थितीत विचार करायला हवा, *माणसाला जे प्राणी खाण्याची परवानगी नाही, तर सिंहांना का दिली जाते?*

माणसासाठी हिरण, ससा आणि इतर शाकाहारी प्राणी अनेक भागांत पारंपरिक आहाराचा भाग आहेत. या प्राण्यांची योग्य प्रमाणात उपलब्धता माणसाच्या पोषणासाठी आवश्यक आहे, विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागात जिथे मांसाहार महत्त्वाचा आहे. पण शासनाने वन्यप्राण्यांचे संरक्षण आणि त्यांच्या शिकारवर बंदी घातली असल्यामुळे, हे नैसर्गिक मांस मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे काही लोक मांसासाठी बाजारात खूप महागडे आणि दुर्लभ प्राणी खरेदी करतात.

सिंह संरक्षणासाठी होणारा खर्च आणि सिंहांसाठी प्राण्यांचे अधिवास राखण्याचा प्रयत्न यामुळे या हिरण-ससा सारख्या प्राण्यांची संख्या नियंत्रित होते. त्यामुळे माणसासाठी नैसर्गिक मांस मिळण्यास अडथळा येतो. हे एक मोठे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न आहे. त्यामुळे 'सिंहांच्या संरक्षणासाठी एवढा खर्च का?' हा प्रश्न समाजात वारंवार येतो. यावर चिंतन आवश्यक आहे की, *जर माणसाला त्याच्या आहारासाठी प्राणी खाण्याची गरज आहे, तर वन्यप्राण्यांच्या व्यवस्थापनात योग्य समतोल साधला पाहिजे*, ज्यामुळे निसर्गही टिकेल आणि मानवी पोषणही होईल.

सिंह आणि इतर प्राण्यांचे अधिवास टिकविणे म्हणजे त्यांना *मोकळे जंगल, नैसर्गिक वातावरण, पुरेसा आहार आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे* होय. परंतु काही वेळा, सिंहांना कोंडून ठेवून त्यांचे प्रदर्शन करून पैसा कमावण्याचा हेतूही बघायला मिळतो, ज्यामुळे संरक्षणाचा खरी भूमिका गहाळ होऊ शकते. खरंतर संरक्षणाचा उद्देश फक्त असा नसून, जनजागृतीसाठी आणि आर्थिक मदतीसाठी अभयारण्य महत्त्वाचे असतात.

अनेक जण म्हणतात की माणसाने प्राण्यांसाठी जागा सोडावी, जंगल जपावे आणि निसर्गाला मोकळेपणा द्यावा, परंतु निसर्ग स्वतःच संतुलित आहे आणि त्यात सतत बदल होत असतात. निसर्गातील *असंतुलनाला फक्त मानवाचा दोष देणे अयोग्य आहे*, कारण प्राणीही स्वार्थी आहेत, अधिवास आणि अन्नासाठी संघर्ष करतात. उदाहरणार्थ, प्राणी त्यांच्या अधिवासासाठी



काही कृती करतात, पण त्याला 'इतराय' म्हणून पाहिले जाते. माणसालाही आपले अस्तित्व टिकविण्यासाठी तसेच अधिकार मिळायला हवेत. त्यामुळे 'मानव हा सर्व दोषी' अशी समजूत काढणे चुकीचे आहे.

भारतामध्ये वन्यजीव संरक्षणासाठी कायदे आहेत, पण ते तयार झाले तेव्हा पर्यावरणाबाबत लोकांमध्ये जागरूकता कमी होती. त्यामुळे ते कायदे अजूनही अमलात आहेत आणि अनेक वेळा स्थानिक लोकांना त्याचा न्याय मिळत नाही. त्यामुळे 'कायद्यांचा अंधाधुंद वापर करून माणसाला थांबवणे' किंवा त्याला दोष देणे चुकीचे आहे. या कायद्यांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

माणूस बुद्धिमान आहे आणि सामाजिक जबाबदारीही त्याची आहे, पण तोही निसर्गाचा एक भाग आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यात ताळमेळ राखणे आपली जबाबदारी आहे आणि त्यासाठी संवाद, संशोधन, सहकार्य आवश्यक आहे.

भारतासारख्या विविधतेने भरलेल्या देशात निसर्ग आणि मानव यांचे नाते अनेक प्रकारचे आहे. मात्र, देशातील अनेक समाजकार्य करणाऱ्या संस्था आणि एनजीओ माणसाला दोष देण्यावरच भर देतात. ही दृष्टीकोन योग्य नाही. त्याऐवजी, व्यवहार्य पर्यावरणीय उपाय, संशोधन आणि मानव-प्राणी सहअस्तित्व याकडे लक्ष दिले पाहिजे.

पाश्चात्य देशांतील संशोधन भारतात मोठ्या प्रमाणावर वापरले जाते, पण त्यांचे सामाजिक, भौगोलिक आणि आर्थिक संदर्भ वेगळे असल्याने त्याचा गुमानपणे स्वीकार करणे योग्य नाही. स्थानिक स्तरावर अधिक संशोधन, सामाजिक संवाद, व्यापक माहिती देणे आवश्यक आहे, ज्यामुळे सर्व स्तरांतील लोकांचा सहभाग आणि सहकार्य वाढेल.

माणसाला दोष देणे सोपे आहे, पण तर्कसंगत आणि समजूतदार उपाय शोधणे महत्त्वाचे आहे. जेव्हा माणसाला सहभागी केले जाईल आणि त्याला संपूर्ण माहिती दिली जाईल, तेव्हाच पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण टिकाऊ राहील.

सिंहांच्या बाबतीत भारतात संकरित सिंह तयार करण्याबाबत कोणतीही अधिकृत धोरणे नाहीत. नैसर्गिक वंशशुद्धतेवरच भर दिला जातो. मानव-सिंह संघर्ष कमी करण्यासाठी भरपाई योजना, कुंपणे उभारणे, तंत्रज्ञानाचा वापर आणि स्थानिक लोकांमध्ये जनजागृती या उपाययोजना राबविल्या जात आहेत.

माणसाचा आणि निसर्गाचा संबंध अतिशय गुंतागुंतीचा आहे. निसर्गातील विविध घटक सतत बदलत असतात. प्रत्येक प्राणी आपला अधिवास आणि अन्न मिळवण्यासाठी संघर्ष करतो. त्यामुळे मानवी हस्तक्षेप हे फक्त 'निसर्गाचा नाश' नव्हे तर काहीवेळा 'संतुलन राखण्याचा एक भाग' असू शकतो. उदाहरणार्थ, काही ठिकाणी माणसाने जंगलं पाडली तरी तो त्याचा उपयोग आपल्या गरजांसाठी करतो; हे निसर्गाचा एक भाग आहे.

निसर्ग स्वतःच असंतुलित आहे. विविध प्रदेशांतील निसर्गाच्या विविध रूपांमुळे निसर्गाला एकसारखे संतुलन शोधणे शक्यच नाही. माणूस आपल्या बुद्धिमत्तेने या बदलत्या निसर्गात आपले स्थान टिकवतो, आपले जीवन सांभाळतो. त्यामुळे निसर्गात असलेले ताळमेळ कायम ठेवण्याचा प्रयत्न हा निसर्गाशी सहअस्तित्वाचा भाग आहे.

मानवावर केवळ दोष देणे ही गोष्ट नेहमीच चुकीची ठरते कारण माणूसही प्राणीच आहे. तोही आपल्या अस्तित्वासाठी स्वार्थी असतो आणि आपल्याला जगण्यासाठी उपाय शोधतो. त्यामुळे माणसाला दोष देण्यापेक्षा, त्याला समजून घेऊन आणि त्याच्या गरजा पूर्ण करताना पर्यावरणाशी ताळमेळ साधण्याचे मार्ग शोधणे अधिक परिणामकारक ठरेल.

सर्वसामान्यपणे लोकांना दिली जाणारी माहिती अनेकदा एकतर्फी असते. अनेक वेळा समाजकार्य करणाऱ्या लोकांनी फक्त माणसाला दोष देण्यावरच भर दिला असतो, ज्यामुळे समाजात संभ्रम वाढतो. त्यामुळे या विषयावर *वास्तविक आणि तर्कसंगत चर्चेची गरज आहे*.

माणसाला दोष देण्यावर ऊर्जा खर्च करण्याऐवजी, *संतुलन राखण्यासाठी नवे उपाय आणि संशोधन व्हायला हवे*. भारतात आणि जागतिक स्तरावर यावर मोठ्या प्रमाणावर संशोधनाचा अभाव आहे. पाश्चात्य देशांचे संशोधन वापरले जाते, पण ते सर्व ठिकाणी लागू पडत नाहीत. त्यामुळे स्थानिक गरजेनुसार आणि संस्कृतीनुसार संशोधन व्हायला हवे.

शेवटी, निसर्ग, मानव आणि प्राणी यांच्यातील हा नाते अत्यंत संवेदनशील आहे. त्यात दोष देणे किंवा विरोध करणे एवढेच पुरेसे नाही, तर तर्कसंगत विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, आणि सामाजिक सहकार्य या तिन्हींचा समन्वय करणे गरजेचे आहे.

जागतिक सिंह दिन हा दिवस फक्त सिंहांचे संरक्षण करण्यासाठी नाही, तर *निसर्ग आणि मानव यांच्यातील सुसंवाद टिकवण्याची जाणीव वाढवण्यासाठी* देखील आहे. आपल्याला भविष्यात यासाठी अधिक जागरूक, समजूतदार आणि संयमी व्हावे लागेल.

**– डॉ. भारत कऱ्हाड, दापोली – जिल्हा रत्नागिरी.**

---

# जागतिक स्तनपान जनजागरण सप्ताह समारोप लेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जागतिक स्तनपान सप्ताह – आईच्या दुधाचे अमूल्य महत्व

प्रत्येक आईसाठी आपल्या बाळाचे आरोग्य हे सर्वोच्च असते. बाळाच्या जन्मानंतर पहिला आणि सर्वांत प्रभावी पोषणाचा स्रोत म्हणजे आईचे दूध. म्हणूनच दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत 'जागतिक स्तनपान सप्ताह' साजरा केला जातो. यामागचा उद्देश म्हणजे स्तनपानाविषयी जागरूकता निर्माण करणे, आईंना प्रोत्साहित करणे आणि समाजात याबाबत सकारात्मक विचार प्रसारित करणे.

**स्तनपानाचे जैविक महत्व**

स्तनपान हे एक नैसर्गिक प्रक्रिया असून, त्यामध्ये आई आणि बाळ यांच्यात शारीरिक व भावनिक नातं घट्ट होतं. स्तनपानामध्ये आईच्या शरीरातून तयार होणारे दूध बाळाला केवळ अन्न नाही, तर रोगप्रतिकारशक्ती, मानसिक विकास आणि दीर्घकालीन आरोग्याचे संरक्षणही देते.

**कोलोस्ट्रम – अमृततुल्य पहिलं दूध**

बाळाच्या जन्मानंतर पहिल्या काही दिवसांत येणारे जाडसर, पिवळसर दूध म्हणजे कोलोस्ट्रम. यामध्ये A इम्युनोग्लोब्युलिन , लॅक्टोफेरिन, व्हिटॅमिन्स आणि रोगप्रतिकारक तत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. हे बाळाच्या आतड्यांच्या विकासासाठी आणि पहिल्या संक्रमणांपासून बचावासाठी अत्यंत आवश्यक असते.

**स्तनपानाचे बाळासाठी फायदे**

१. पूर्ण आहार – आईच्या दुधात सर्व पोषक घटक समाविष्ट असतात – प्रथिने, चरबी, कार्बोहायड्रेट, जीवनसत्त्वे आणि खनिजे.

२. रोगप्रतिकारशक्ती – आईचे दूध बाळाला विविध संसर्गांपासून वाचवते.

३. मोटर आणि न्यूरो डेव्हलपमेंट – बाळाची मेंदूची वाढ अधिक चांगली होते.

४. आतड्यांचे आरोग्य – स्तनपानामुळे बाळाला डायरिया, कॉलिक किंवा अन्न न पचणे अशा समस्या कमी होतात.

५. लठ्ठपणा टाळतो – स्तनपान केलेल्या बाळांमध्ये भविष्यात लठ्ठपणा, डायबेटीस किंवा एलर्जीक आजार कमी प्रमाणात आढळतात.

६. मुलांच्या बुद्धीवर परिणाम – संशोधनानुसार स्तनपान केलेल्या मुलांची आय.क्यू. पातळी जास्त असते.

**आईसाठी स्तनपानाचे फायदे**

१. गर्भाशयास मदत – स्तनपानामुळे शरीरात ऑक्सिटॉसिन वाढते, जे गर्भाशय पुनः आपल्या मूळ अवस्थेत परत आणण्यास मदत करते.

२. रक्तस्त्राव कमी होतो – प्रसवोत्तर रक्तस्त्राव (Postpartum Bleeding) कमी होतो.

३. गर्भधारणेची शक्यता कमी – स्तनपान हे नैसर्गिक गर्भनिरोधक म्हणूनही काम करते (LM² - Lactational menorrhea Method).

४. स्तनाचा व गर्भाशयाचा कर्करोग टाळतो – दीर्घकालीन स्तनपान करणाऱ्या महिलांना स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाचा धोका कमी असतो.

५. वजन नियंत्रणात राहते – स्तनपान करताना आईचे शरीर अधिक उष्मांक (लरश्रेळशी) वापरते.

६. भावनिक समाधानीपणा – स्तनपानामुळे आईच्या मेंदूमध्ये आनंद निर्माण करणाऱ्या रसायनांचे प्रमाण वाढते.

**स्तनपानाची शिफारस**

WHO (World Health Organization) व UNICEF यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार:

- जन्मानंतर पहिल्या एक तासातच स्तनपान सुरू करावे.
- बाळाला पहिल्या सहा महिन्यांपर्यंत फक्त आईचे दूध द्यावे – कोणतेही पाणी, मध, अन्न किंवा औषधे न देता.
- सहा महिन्यांनंतर पूरक आहार सुरू करून स्तनपान दोन वर्षांपर्यंत चालू ठेवावे.

**स्तनपान न करण्याची कारणे**

- आईला आलेल्या काही वैद्यकीय अडचणी (HIV, टीबी, स्तनातील संसर्ग)
- नवजात बाळाचे विशेष स्थिती (क्लिफ्ट पॅलेट, प्रिमॅच्युअर बाळ)
- अज्ञान व चुकीच्या सामाजिक धारणा
- स्तनपानाविषयी चुकीची माहिती (उदा. दूध पुरेसे नाही, बाळ रडतं म्हणजे दूध लागत नाही)

**समाज व कुटुंबाची भूमिका**

- आईला शारीरिक व मानसिक आधार देणे.
- बाळंतिणीस विश्रांती, संतुलित आहार व भरपूर पाणी देणे.
- नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी स्तनपानाची सुविधा, वर्क फ्रेंडली तास, लेक्टेशन रूम उपलब्ध करणे.
- आजी, सासू यांना स्तनपानाविषयी योग्य माहिती देणे.
- स्तनपान हे आईचे कर्तव्य नसून तिचा अधिकार आहे हे समजणे आवश्यक आहे.

**शिशुविभाग, माता–बालकल्याण व धोरणे**

भारत सरकारने स्तनपानाला चालना देण्यासाठी विविध योजना राबवल्या आहेत:

१. MAA Programme (Mothers' Absolute Affection) – स्तनपानाविषयी प्रचार व सल्ला देणारे.

२. POSHAN अभियान – कुपोषणाविरुद्ध एकात्मिक प्रयत्न.

३. आंगणवाडी, आशा व आरोग्यसेविका यांच्यामार्फत स्तनपान सल्ला.

४. BFHI (Baby Friendly Hospital Initiative) – जागतिक आरोग्य संघटनेचा उपक्रम.

**स्तनपानाबाबत रूढी व अंधश्रद्धा**

काही अपप्रवृत्त धारणांमुळे स्तनपान सुरुवातीला टाळले जाते, जसे की:

- पहिलं दूध दूषित असतं.
- मुलगाच झाला तर भरपूर दूध येतं.
- आई गरोदर असेल तर स्तनपान बंद करावं.
- बाळ फार रडतो म्हणजे दूध लागत नाही.

**ही सगळी अंधश्रद्धा असून विज्ञानाच्या आधारावर योग्य सल्ला आवश्यक आहे.**

**स्तनपान आणि काम करणाऱ्या महिला**

- स्तनपानासाठी लवकर ऑफिस सुटणे किंवा लवकर परत येणे – मातृत्व रजेचा योग्य वापर.
- ऑफिसमध्ये लेक्टेशन रूम, पंपिंग सुविधांची आवश्यकता.
- भरवलेले दूध (expressed milk) योग्य तापमानात ठेवून पुढील खुराकसाठी वापरणे.
- सहकारी महिला व पुरुषांनी समजूतदारपणा दाखवणे.

**तांत्रिक मदत – स्तनपान सल्लागार**

स्तनपानात अडचण आल्यास, Lactation Consultant कडून सल्ला घ्यावा.

उदा. –

- स्तनात वेदना किंवा सूज
- बाळाला योग्य पोझिशन मिळत नाही
- बाळ अकार्यक्षमतेने दूध पितो

**कोविड–१९ व स्तनपान**

कोविड काळातही स्तनपान बंद करण्याची गरज नाही. योग्य खबरदारी (हात धुणे, मास्क) घेऊन स्तनपान सुरू ठेवता येते. कोविडच्या लसीकरणाने स्तनपान करणाऱ्या महिलांमध्ये अडचण येत नाही, उलट अँटीबॉडीज बाळात जातात.

**निष्कर्ष**


स्तनपान ही केवळ आई आणि बाळ यांच्यातील शारीरिक देवाणघेवाण नाही, तर भावनिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने देखील अत्यंत मूल्यवान प्रक्रिया आहे. स्तनपानाला प्रोत्साहन देणे म्हणजे एका आरोग्यदायी पिढीच्या पायाभरणीचा भाग आहे.

आईचे दूध हेच बाळासाठी सर्वांत चांगले 'पहिले लसीकरण' आहे.



**– डॉ. मीनल चिडगुपकर**
**स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ**
**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, मेडिकल सब कमिटी मेंबर**
**मो. नं. ९८९०८३८८८४**

---



# झाडीपट्टी नाट्यसंमेलनाचे खरे वैभव कलावंतच....!

## देशभरातील नामवंत कलावंत, नेते-अभिनेते राहणार उपस्थित : झाडीपट्टी रसिकांसाठी खास मेजवानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी (गोदिंया) : आमच्या मातीचा खरा हिरा हा झाडीपट्टीतील ग्रामीण भागातून निर्माण झालेला कलावंत आहे. त्याच्या कलेची छाप भारतभर पसरुन शासन स्तरावर दखल घेण्याजोगे झाले आहे. मुंबई, पुणे, नाशिक सारख्या चित्रपट सृष्टीला आता टक्कर आमची झाडीपट्टी रंगभूमी देते हे वास्तव नाकारायला जागाही राहिली नाही. म्हणून याचे भलित झाडीपट्टी नाट्यसंमेलनाचे खरे वैभव कलावंतच....! आहेत.

पूर्व विदर्भातील गर्द वनराईने नटलेल्या समस्त झाडीपट्टी रंगभूमीचे माहेरघर असलेल्या देसाईगंज-वडसा शहरातील महाविद्यालयाच्या प्रांगणात दि.४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य पाचवे झाडीपट्टी नाट्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाला देशभरातील नामवंत कलावंत, नेते-अभिनेते, रंगकर्मी यांची उपस्थिती राहणार आहे. या दरम्यान संमेलनाचे यथायोग्य नियोजनबध्द संचालन करण्यासाठी नाट्य संविधाप्रमाणे विविध समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

यात प्रामुख्याने आर्थिक समितीवर संमेलनाध्यक्ष प्रा. आत्माराम खोब्रागडे, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, विजय सहारे, युवराज गोंगले, परमानंद गहाणे, डॉ. अनिरुद्ध वनकर, अंकुश पेटकर, प्रा. डॉ. शेखर डोंगरे, चेतन वडगाये, शेखर पटले, हिरालाल सहारे, युवराज प्रधान, नितीन नाकाडे, संदीप राऊत, राज मराठे, मुकेश गेडाम, विलास कावळे यांचा समावेश करण्यात आला आहे.

स्मरणिका संपादक मंडळात राजकुमार मुसने, प्रा. सदानंद बोरकर, प्रा. डॉ. धानोरकर, डॉ. शेखर डोंगरे,

> **महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील कधी न झालेले असे झाडीपट्टीच्या कुशीत हे नाट्य संमेलन रंगणार आहे. याचे वैभव हा कलावंत ठरणार आहे.**
> **– डॉ. अनिरुद्ध वनकर, अध्यक्ष, झाडीपट्टी विकास महामंडळ.**

प्रा.जे.टी. मेश्राम, प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर प्रसिद्धी प्रमुखपदी किशोर मेश्राम, रुपेश मेश्राम, प्रल्हाद मेश्राम, पुंडलिक भांडेकर, प्रणय देवगडे, होमदेव कोशम शिले, किरपाल सयाम, भावेश कोटांगले, अतुल बुराडे, पुण्यशील कोचे, शरद ठाकरे, भुवन लिल्हारे, तसेच लोकमत प्रतिनिधी बाराभाटी नंदागवळी यांची नियुक्ती करण्यात

> **संमेलन भव्यदिव्य करण्यासाठी पदाधिकारी कामाला लागले असल्याची माहिती झाडीपट्टी नाट्य विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.**

आली आहे. याशिवाय विविध समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आमदार अभिजीत पाटील यांनी रक्षाबंधन सण केला साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर त्यांच्या निवासस्थानी रक्षाबंधन हा सण भाऊ बहिणीच्या नात्यातील गोडवा अधिक वाढवतो ही राखी म्हणजे दोघांमधील अतूट आणि पवित्र नाते समाजाची साक्षा असते.





आजरक्षाबंधनानिमित्त माझ्या बहिणीने निवासस्थान येऊन प्रेम, विश्वास, आपुलकीने प्रतीक असणारी राखी माझ्या हाती बांधली व बहिणीच्या हातून राखी बांधून घेताना त्यांच्याबद्दल माझी असणारी प्रेमाने कृतज्ञता व्यक्त करत मोकळ्या गप्पा मारल्या याप्रसंगी त्यांनी त्यांच्या रक्षणाची जबाबदारी मनापासून पूर्ण करत असल्याची समाधान व्यक्त केले.

# इंदापूर पोलिस स्टेशन येथे तेज पृथ्वी ग्रुपच्या संस्थापक अध्यक्ष अनिता ताई खरात यांनी पोलिस भावांना राखी बांधून रक्षाबंधन केले साजरे









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : पुणे (इंदापूर): पोलिस दलात काम करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना आपल्या परिवार पासून दूर राहून आपले कर्तव्य बजवावे लागत असल्याने त्यांना या सणा पासून वंचित राहावे लागत असल्याचे लक्षात घेत तेज पृथ्वी ग्रुप च्या संस्थापक अध्यक्षा अनिता ताई खरात यांनी सालाबाद प्रमाणे यावर्षीही इंदापूर पोलीस चौकीत राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

कर्तव्य बजावून जनतेच रक्षण करणाऱ्या पोलिस बांधवांना बहिणीची उणीव भासू नये. त्यामुळे या पोलिस कर्मचाऱ्यांना राख्या बांधून आज त्यांच्यासोबत रक्षाबंधन साजरे केले.

दीर्घायुष्य आणि निरोगी आयुष्य लाभो, देव त्यांच रक्षण करो, अशी प्रार्थना या पोलीस बांधवांसाठी अनिता ताई खरात यांनी देवाकडे केल्याचं यावेळी पहायला मिळालं.

जे कायमच आपल्या लाखो बहिणींचे संरक्षण करतात नेहमी महिलांच्या आपल्या बहिणींच्या संरक्षणासाठी दिवस रात्र एक करतात असे आमचे पोलीस बांधव यांना तेज पृथ्वी ग्रुपच्या वतीने राखी बांधून त्यांच्याकडून सदैव आम्हा बहिणीचे संरक्षण करावे अशी अपेक्षा आणि हीच रक्षा बंधनाची भेट असे ही अनिता ताई खरात म्हणाल्या

माझे पोलीस भाऊ सदैव बहिणींचे रक्षण करतात आणि त्यांनी आमच्या पाठीशी कायमच खंबीरपणे उभे रहावे हे वचन आज मी भेट स्वरूपात घेते, असे यावेळी तेज पृथ्वी ग्रूपच्या संस्थापक अध्यक्षा अनिता ताई खरात म्हणाल्या.

# डुबेरे जनता विद्यालयात झाडांना राखी बांधून पर्यावरणपूरक रक्षाबंधन साजरे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनधी/सोमनाथ गिरी : नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'एक वृक्ष- एक राखी' उपक्रमांतर्गत वृक्षांना पर्यावरणपूरक राख्या बांधून रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षिका जयश्री पगारे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी विद्यार्थिनींनी सुंदर व आकर्षक पर्यावरणपूरक राख्या स्वतः तयार करून विद्यालय परिसरातील झाडांना बांधल्या. राखी झाडाला- संरक्षण निसर्गाला,राखी साजरी करा - पर्यावरणाशी मैत्री करा या घोषणेतून विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. यावेळी पर्यवेक्षिका जयश्री पगारे,सोमनाथ गिरी,विद्या ठाकरे,कल्पना शिंदे,सीमा गोसावी, डी. ए.रबडे, रेखा खंडीझोड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक रंगनाथ उगले म्हणाले की, रक्षाबंधन हा सण केवळ भावंडांतील प्रेमाचे बंध जपणारा नसून संरक्षण, स्नेह व जबाबदारी यांचे प्रतीक आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात सर्वांनी वृक्षाची काळजी घ्यावी. वृक्ष लागवड व संवर्धन करणे काळाची गरज आहे.कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक समितीच्या वतीने करण्यात आले. सूत्रसंचालन सांस्कृतिक समिती प्रमुख सुनिल ससाणे यांनी तर आभार प्रदर्शन जयश्री गोहाड मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# दहिवलीत युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेकडून रक्षाबंधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था, दहिवली तर्फे रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. जे कर्तव्य बजावतात त्या शासकीय कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पोलिस, विद्युत महामंडळ कर्मचारी, सुरक्षारक्षक, अग्नीशामक दल, आरटीओ अधिकारी तसेच हॉस्पिटलमधील डॉक्टर व रुग्णसेवेत असलेले कर्मचारी यांना राखी बांधण्यात आली.





अनेकदा कामांमुळे कर्मचारी आपल्या कुटुंबासोबत सण साजरा करू शकत नाहीत. विशेषतः पोलिसांना मुलींचे रक्षण करणारे भाऊ मानले जाते. म्हणूनच त्यांना बहिणींच्या प्रेमाचा हा सण आम्ही प्रत्यक्ष जाऊन साजरा केला. असे यावेळी युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.

या उपक्रमातून समाजातील सेवाभावी वृत्ती वाढावी आणि आदराची भावना निर्माण व्हावी हा हेतू युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेने व्यक्त केला.

# चिमुकल्यांनी बांधली सफाई कर्मचाऱ्यांना राखी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैनतेय विद्यामंदिरात अनोखे रक्षाबंधन

निफाड/प्रतिनिधी : बहिण-भावाच्या अतूट नात्याच्या रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थीनींनी स्वच्छतेचे काम करून सर्व नागरिकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यास मदत करणा-या सफाई कर्मचा-यांना राख्या बांधून सामाजिक बंधुत्वाचा संदेश दिला.

निफाड नगरपंचायतीतील सफाई कर्मचारी यांचा शिक्षक गोरख सानप, किरण खैरनार, संजय जाधव यांच्या हस्ते टोपी, गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व विद्यार्थीनींनी सर्व कर्मचारी बंधूच्या राबणा-या हातांवर राखी बांधली.

**चिमुकल्यांनी आमचा केलेला सन्मान व आमच्या कार्याची घेतलेली दखल यामुळे आम्ही भारावून गेलो. या रक्षाबंधनाच्या सोहळ्याने आमचे काम अधिक निष्ठेने करण्याची प्रेरणा मिळाली.**
**– मनोज ढकोलिया, सफाई कर्मचारी, नगरपंचायत निफाड**

**शहरातील सफाई कर्मचारी स्वतः घाणीत जगतात पण इतरांचं रोगराईपासून रक्षण करतात. या कष्टक-यांच्याच मेहनतीवर समाज चालला आहे. आणि तेच योग्य मोबदला व सन्मानापासून वंचित आहेत. चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम समाजाला प्रेरणा देणारा आहे.**
**– वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष न्या रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

**सुनील माळी, मनोज ढकोलिया, प्रशांत पवार, आशिष झाल्टे, कृष्णा निकम, सागर अस्वले, गोविंद गांगुर्डे, समाधान गांगुर्डे, अरूण धारराव, बिलाल पठाण, तुषार इंगळे, संकेत मोगरे, राजेश निशाद, अविनाश केदारे, सागर गांगुर्डे यांचा सन्मान करण्यात आला**

गाडी वाला आया घरसे कचरा निकाल असा संदेश देत घंटागाडीतून घराघरातील, वसाहती, गल्ल्या, मंदिरे, शासकीय कार्यालये, शाळा, बाजारपेठा येथील केरकचरा विनातक्रार गोळा करून संपूर्ण गाव स्वच्छ करणा-या या स्वच्छता दूतांच्या कार्याचा याप्रसंगी गौरव करीत सलाम करण्यात आला. चिमुकल्यांच्या या अनोख्या सत्काराने अनेक कर्मचारी भावूक होऊन त्यांचे डोळे पाणावले.

कोणतेही काम कमी दर्जाचे नाही असा सामाजिक एकतेचा संदेश देत रक्षाबंधन सणाचे मांगल्य जपत शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, संस्थापक विश्वस्त ड ल.जि. उगांवकर, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी लता भरसट, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गोरख सानप, किरण खेरनार, संजय जाधव, कल्पना पेठे, प्रतिभा खैरनार व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# बहिण भावाच्या पविञ नात्याची राखी पोर्णीमा सण साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : बहिनींनी भावाला औक्षण करत ओवाळनी करत पवित्र नाते जपत बहिनिंनी भावाला राखी बांधत जल्लोशात साजरी केली राखी पोर्णीमा ...

औसा तालुक्यात भाव भावनांनी नटलेला राखी पौर्णिमा सण उत्साहानं साजरा झाला. बहिणी आणि भावांच्या नात्यातले पवित्र भावना लक्षवेधी वातावरणात व्यक्त झाल्या. राखी पौर्णिमेच्या या दिवशी गावोगावी बहिणींनी आपल्या भावांना राखी बांधून त्यांच्या बंधु आरोग्य, व बंधु सुरक्षेची प्रार्थना केली, तर भावांनीही आपली जबाबदारी आणि प्रेम जाणवत राखी बांधणाऱ्या बहिणीसाठी सदैव साथ देण्याचे आश्वासन दिले.

या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेत भाउ-बहिणीचा नात्यांचा केंद्रबिंदू ठरतो.रक्षाबंधन सण औसा तालुक्यात राखी पौर्णिमेचे महत्त्व नेहमीच खूप मोठ्या उत्साहाने पार पडते. यंदाही श्रावण मासाच्या पोर्णिमेला राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त संपुर्ण यथास्थितीत राखी बांधण्यात आला. बहिणींनी भावाला औक्षण करत राखी बांधण्याचा भावाच्या हातात राखी बांधत आपल प्रे व्यक्त केले .

तालुक्यातील विविध गावांमधील भाउ बहिनींनी एकत्र येऊन राखी पोर्णीमा साजरी करत बहिणींच्या मुखातून भावाला मधुर शुभेच्छा दिल्या गेल्या, तर भावांकडून त्यांच्या बहिणीसाठी आयुष्यभराच्या शुभेच्छांची देवाणघेवाण झाली. या दिवशी केल्या जाणाऱ्या पूजा व विधींचा सामाजिक आणि सांस्कृतिक दोन्ही पैलू फार मोठा आहे, कारण हे नाते सामाजिक बंधनांचे प्रतीक म्हणूनही बघितले जाते.



औसा तालुक्यातील उमटलेल्या वातावरणाबद्दल ग्रामिन भागातील राखी पौर्णिमा हा दिवस भाव भावनांचा साक्षात्कार आहे. प्रत्येक बहिण आपल्या भावासाठी आरोग्य आणि समाधानाची प्रार्थना करते, तर भाउही तिचे रक्षण करण्याचा निर्धार करतात. या सणामुळे नात्यांमध्ये आस्था वाढते आणि सामाजिक एकात्मता दृढ होते.

राखी पौर्णिमा सणाच्या निमित्ताने पूर्णिमेसाठी पूजा, स्नान, व्रत, आणि विविध धार्मिक विधीही करण्यात आले. याचा प्रभाव फक्त घरगुती नातेसंबंधांपुरता मर्यादित नसून, इतर सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांवरही सकारात्मक ठरतो.

अशा पद्धतीने सण संबंध औसा तालुक्यात राखी पौर्णिमेची परंपरा आणि नातेसंबंधांची जाणीव उत्साहात साजरी झाली.

# राखी पौर्णिमेनिमित्त प्राध्यापिकांनी बांधल्या स्वामी भक्तांना राख्या



## मुंबई, पुणे, रोहा व नाशिकच्या भाविकांनी बांधून घेतल्या राख्या

**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापिकांकडून स्वामी समर्थ समाधी मठ परिसरात दर्शनासाठी आलेल्या मुंबई, पुणे, रोहा व नाशिक येथील भाविकांनी आवर्जून प्राध्यापिकांकडून राख्या बांधून घेतल्या. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर कृतार्थतेचे भाव दिसत होते.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी विभागाच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना प्राध्यापिकांनी राखी बांधून त्यांचा आनंद द्विगुणित केला.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी विभागाचा उपक्रम

स्वामी समर्थ समाधी मठ परिसरात राखी पौर्णिमेनिमित्त रक्षाबंधनाचा उपक्रम प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रबोधिनीचे चेअरमन प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा सौरभ भस्मे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा शीतल फुटाणे,बालाजी कांबळे उपस्थित होते.

स्वामी भक्तांना प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार यांनी राख्या बांधल्या. आज खरंच आम्हाला आमची बहीणच भेटली आहे, अशी भावना स्वामीभक्तांनी व्यक्त केल्या.

## भाविकांनी केले प्राध्यापिकांचे कौतुक

**उच्चशिक्षित प्राध्यापिका राखी बांधण्यासाठी आवर्जून आल्या हे पाहून उपस्थित भाविकांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापिकांचे कौतुक केले. आम्हाला राखी पौर्णिमेनिमित्त बहिणी मिळाल्या अशा भावना एका भाविकांने व्यक्त केल्या.**

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर महाविद्यालय विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले.

# नॅनो युरीया वापरण्यासंदर्भात कृषी विभागाकडून जनजागृती आवश्यक

## शेतकऱ्यांकडून नँनो युरीया वापरावर होतेय नापसंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आता युरिया कुठे मिळेल असा प्रश्न शेतकरी बर्याचवेळा विचार-ताना दिसतात कारण बहुतांश कृषी सेवा केंद्रांवर युरियाचा साठा उपलब्ध होत नाही. मात्र, नॅनो युरिया आहे तो घ्या, असे दुकानदार कळकळीने सांगूनसुद्धा जनजागृती अभावी शेतकरी मात्र नॅनो युरिया घेण्यास नापसंती दर्शवित आहे. दरम्यान निफाड तालुक्यात यंदा मक्याचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे शेतकऱ्यांकडून युरियाची मागणी होत आहे.

नॅनो युरियाची एक बॉटल साधारणतः २२० रुपयाला बाजारात मिळते. यामध्ये संपूर्ण एक एकरावर फवारणी होते. नॅनो युरियाला फक्त फवारणीसाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. यामुळे शेतकरी त्याकडे पाठ फिरवत आहे. नॅनो युरियाचे कुठलेही दुष्परिणाम नाहीत.हा सरळ पिकांवर फवारला जात असल्यामुळे जमिनीची पोत खराब होत नाही. नॅनो युरियाचा पिकांवर लगेच परिणाम दिसत नाही, मात्र तो पिकाला हानिकारक नाही. दरम्यान, युरिया हा सरळ जमिनीत टाकला जात असल्यामुळे जमिनीमध्ये नत्राचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त वाढते. यामुळे जमिनीची पोत खराब होत आहे. युरियामुळे पर्यावरणाची समस्या निर्माण होत आहे. युरियाचे मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.कृषी विभागाकडून नॅनो युरिया वापरण्यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर जनजागृती व मेळावे आयोजित करण्याची गरज आहे. नॅनो युरियाचे महत्त्व सांगून नॅनो युरिया काळाची गरज असल्याचे शेतकऱ्यांना सांगण्याची गरज आहे.युरिया टाकल्यानंतर लगेचच पिकाची वाढ होते. मात्र, ही तातडीची वाढ हानिकारक असते. युरियाची कृत्रिम टंचाई होते की शासनाकडूनच साठा उपलब्ध होत नाही, हे कृषी विभागाने वेळो-वेळी स्पष्ट करण्याची गरज असते. गरजेपोटी अव्वाच्या सव्वा भावाने शेतकऱ्यांना युरिया घ्यावा लागत असतो. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. युरिया खताची चढ्या भावाने विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर कारवाई करण्याची मागनी शेतकरी वर्गाकडून होते.




> **पारंपरिक युरियाच्या तुलनेत नॅनो युरियाचा वापर कमी प्रमाणात केला जातो,पन त्यामुळे खताचा खर्च कमी होतो नॅनो युरिया पिकांमध्ये सहजपणे शोषला जातो आणि पिकाच्या वाढीसाठी आवश्यक पोषक तत्वे पुरवतो, नॅनो युरियाचा वापर नायट्रेट लीचिंग आणि वायू उत्सर्जन कमी करतो, त्यामुळे पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होतो,नॅनो युरियाचा वापर पिकांच्या वाढीस मदत करतो आणि त्यामुळे चांगले उत्पादन मिळते असे सर्व असुन सर्व सामान्य शेतकऱ्यांकडून नँनो युरीया वापरा संदर्भात नापसंती केली जाते यासाठी महाराष्ट्र शाशनाच्या कृषी विभागाकडून जनजागृती आवश्यक आहे.**
>
> **–संजय साठे**
> **शेतकरी,नैताळे ता.निफाड**

## रक्षाबंधन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : रक्षाबंधन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम, कौस्तुभ मणी, मोत्याचा तुरा, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याची कंठी, मोत्याचा हार, बाजीराव कंठी, मत्स्य जोड, तुळशीची माळ, सहा पदरी जान्हवे, लहान-मोठा शिरपेच, राखी तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक राजेंद्र सुभेदार यांनी दिली.

## मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पंचायत समिती अक्कलकोट येथे आयोजित मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२५ मध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य गौरव समारंभ उत्साहात पार पडला. या सोहळ्याला पालक, शिक्षक, मान्यवर आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुष्प-गुच्छ व पारंपरिक पगडी घालून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणारा आणि ज्ञानाची कदर करणारा असा हा प्रेरणादायी सोहळा ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे शिक्षण विस्ताराधिकारी श्री सोमशेखर स्वामी साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून मा गटविकास अधिकारी श्री शंकर कवितके साहेब, अक्कलकोट दक्षिण चे पोलिस निरीक्षक मा. महेश स्वामी साहेब, अक्कलकोट उत्तर पो स्टे चे सहाय्यक पो निरीक्षक बागाव साहेब, कृषी अधिकारी श्री टिटवे साहेब, कक्ष अधिकारी श्री दयानंद परिचारक साहेब, हत्तीकणबस केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार साहेब हत्तीकणबस सरपंच मा श्रीशैल माळी साहेब, ग्रामविकास अधिकारी श्री वंजारी साहेब मा. केंद्रप्रमुख श्री इस्माईल मुर्डी साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि शिक्षक व पालक प्रतिनिधी होते.

यावेळी वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांना सतत स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून उज्ज्वल भविष्यासाठी सज्ज होण्याचे आ-वाहन केले.

विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य व संस्थेच्या नियोजनशील कार्यपद्धतीचा मोठा वाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडले गेले याबद्दल संयोजक सौं अश्विनी जाधव व मंथन परिवाराचे सर्वांनी खूप कौतुक केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शितल डावरे सर व श्री अरुण पांचाळ सर व आभार श्री राजाराम सुरवसे सर यांनी मांडून कार्यक्रमाचा समारोप केला.

## कळंबची डॉ. संपदा रणदिवे हि एआयएसीजीईटी (एम डी) परिक्षेत देशात चौथी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : डॉ.संपदा अशोक रणदिवे मुळची इटकुर ता. कळंब जि.धाराशिव, डॉ. संपदा चे वडील कळंब एस टी डेपो येथे मेकॅनिक म्हणुन नौकरी करतात. मुलांच्या शिक्षणासाठी ते कळंब या ठिकाणीं स्थाईक झाले.

डॉ. संपदाचे १०वी पर्यंतचे शिक्षण कळंब येथे झाले आणि उच्च शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय अंबेजोगाई या ठिकाणीं झाले. त्यानंतर शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड या ठिकाणी बी ए एम एस डिग्री प्राप्त करुन तिने पुढील (एम् डी) या शिक्षणा साठी तयारी करत डॉ.संपदाने महाराष्ट्रात नव्हे तर चक्क भारतात ऑल इंडिया आयुष्य पोस्ट ग्रॅज्युएट

एट्रान्स परिक्षा अर्थात एआयएसीजीईटी (एम डी) या देश देशपातळीवरील परीक्षेत भारतातून ७७ वा नंबर व कॅटेगिरी मधून भारतातून ४ था (चौथा) नंबर पटकाविला आहे. त्यासाठी इ.सन २०२५ साठी एकूण ४२ हजार डॉक्टरांनी परीक्षा दिली होती. त्या पैकी २ हजार २७४ जागा उपलब्ध असतात.त्यामध्ये डॉ . संपादने भारतातून ७७ वा नंबर व कॅटेगिरी मधून भारतातून ४ था (चौथा) नंबर पटकाउन आपल्या आई वडिलांचे कुटुंबाचे व समाजाचे स्वप्न पुर्ण करुन एक आगळा वेगळा आदर्श सर्वांच्या डोळ्यासमोर ठेवला आहे.

डॉ.संपदाच्या यशाचे कौतुक पूर्ण जिल्ह्यातून, सर्व स्थरातून होत आहे. आशा जिद्दीवान व आपल्या आई वडिलांचे स्वप्न पुर्ण करणाऱ्या डॉ.संपदास पुढील वाटचालीस खुप खुप मनपूर्वक शुभेच्छा.

> **भारतातून सर्व साधारण मधुन ७७ वा नंबर व कॅटेगिरी मधून भारतातून चौथा नंबर**



## केगावमध्ये सर्वंकष लैंगिकता शिक्षणावरील दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : केगाव ता. उत्तर सोलापूर येथील स. म. शंकरराव मोहिते पाटील विद्यालय येथे प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वंकष लैंगिकता शिक्षण या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, एफपीआयचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, अध्यक्ष प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांच्या मार्गदर्शनखाली फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे कार्यक्रम अधिकारी विरेंद्र परदेशी, सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे, स्वप्निल सोनवणे आणि विकी शिवशरण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

इ. ५ वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत किशोरावस्था, वैयक्तिक स्वच्छता, किशोरवयातील आहार, एचआयव्ही/एड्स, मासिक पाळी, बालशोषण प्रतिबंध, जीवनकौशल्ये, वयात येतानाचे शारीरिक व मानसिक बदल, तसेच गुड टच - बॅड टच या महत्त्वाच्या विषयांवर पी. पी. टी. च्या सहाय्याने मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर क्राईम विषयावर सोलापूर ग्रामीण सायबर क्राईम विभागाचे स्वप्निल पवार आणि प्रकाश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे पुनरावलोकन करण्यासाठी सापशिडी खेळाच्या माध्यमातून प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले, यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

## नैताळे सोसायटीच्या चेअरमनपदी बाळासाहेब बोरगुडे तर व्हा.चेअरमनपदी संतोष सुरासे बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : नैताळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सर्व संचालकांची महत्वाची बैठक निवडणूक अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी १ दत्तात्रेय नाईकरे यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक निबंधक कार्यालय निफाड येथे बोलविण्यात आली होती यावेळी संस्थेच्या चेअरमनपदी रविंद्र उर्फ बाळासाहेब बोरगुडे तर व्हाईस चेअरमनपदी संतोष सुरासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवड होताच सर्व समर्थकानी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.



नैताळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे चेअरमन सर्जेराव बोरगुडे व व्हाईस चेअरमन निर्मला बोरगुडे यांनी अंतर्गत ठरलेल्या रोटेशन पध्दतीनुसार आपआपल्या पदाचे राजीनामे दिले होते सदरचे राजीनामा पत्र मंजुर झाल्याने नविन चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीसाठी बैठक बोलविण्यात आली होती यावेळी चेअरमन पदासाठी रविंद्र उर्फ बाळासाहेब बोरगुडे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले त्यावर सुचक म्हणून रतन बोरगुडे व अनुमोदक म्हणून महेश बोरगुडे यांनी सह्या केल्या तर व्हाईस चेअरमनपदासाठी संतोष सुरासे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले त्यावर सुचक म्हणून शिवाजी बोरगुडे यांनी तर अनुमोदक म्हणून देविदास बोरगुडे यांनी सह्या केल्या होत्या प्रत्येकी एक नामनिर्देशन पत्र निवडणूक अधिकाऱ्यांना विहित मुदतीत प्राप्त झाल्याने व ते छाननीत योग्य व बरोबर असल्याने निवडणूक अधिकारी दत्तात्रेय नाईकरे यांनी बिनविरोध निवड झाल्याची घोषना केली.या सभेस संचालक शिवाजी बोरगुडे, रतन बोरगुडे,महेश बोरगुडे,देवीदास बोरगुडे,दादा बोरगुडे ,संतोष घायाळ,नवनाथ भवर ,निर्मला बोरगुडे ,अरुन विघे ,यांच्यासह लासलगाव बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोर-गुडे ,माजी सरपंच संजय बोरगुडे ,नित्यानंद बोरगुडे,राजेंद्र बोरगुडे ,देवीदास डावखर ,बाळासाहेब बोरगुडे ,याकुब पठाण ,रविंद्र बोरगुडे ,दत्तु मोरे ,बापूसाहेब बोरगुडे सचिव भाऊराव दराडे,प्रभाकर घायाळ,योगेश बर्डे उपस्थित होते.निवड बिनविरोध झाल्यानंतर चेअरमन बाळासाहेब बोरगुडे व व्हाईस चेअरमन संतोष सुरासे यांचा सस्थेच्या कार्यालयात सभासद व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### कलम ८३ च्या चौकशीचा अहवाल देण्यास टाळाटाळ : ॲड. अशोक शिंदे

## शिवकृपा पतसंस्थेच्या चौकशी अधिकाऱ्यावर दबाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिवकृपा सहकारी पतपेढी मुंबई या संस्थेतील तथाकथित कारभाराबाबत तक्रार केल्यानंतर सहकार आयुक्तांनी कलम ८३ प्रमाणे चौकशीचे आदेश दिले. परंतु तीन महिने उलटले तरी अद्याप अहवाल देण्यास टाळाटाळ केली जाते आहे. चौकशी अधिकार्यांवर दबाव असल्यामुळे अधिकारी बदलून निरपेक्षपणे चौकशी करण्याची मागणी माहिती माजी संचालक आणि मूळचे शेगाव (ता. जत) येथील ॲड. अशोक शिंदे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केली.




ॲड. शिंदे म्हणाले, संस्थेच्या जागृत सभासदांनी वार्षिक सभेत लेखी प्रश्न विचारल्यानंतर उत्तर दिले जात नाही. मनमानी कारभार सुरू आहे. सभासदांच्या पैशाची वारेमाप उधळपट्टी सुरू आहे. संस्थेच्या १०३ शाखा आहे. सांगली जिल्ह्यात नऊ शाखा आहेत. भरती, बढती व बदल्यांच्या धोरणाचे उल्लंघन केले आहे. सहा महिन्यात सांगली-कोल्हापूर परिसरातील १५० कर्मचार्यांना काढून टाकले. वाहन खरेदी, मंदिर देणग्यातून उधळपट्टी सुरूच आहे. पतपेढीला राजकीय अड्डा बनवले आहे. त्यामुळे माझ्यासह सभासद संदीप खामकर, बाळासाहेब डोळस, सतीश गावडे, काशीराम सावर्डेकर यांनी सहकार आयुक्त पुणे यांच्याकडे तक्रार केली होती.

अप्पर निबंधक श्रीकृष्ण वाडेकर यांनी १७ मार्च २०२५ रोजी कलम ८३ नुसार चौकशीचे आदेश दिले. उपनिबंधक राम कुलकर्णी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. चौकशी अधिकारी दबावाखाली काम करीत आहेत. तीन महिने उलटले तरी दबावामुळे अहवाल दिला नाही. त्यामुळे चौकशी अधिकारी बदलण्याची मागणी केली आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांना देखील भेटून पतसंस्थेच्या चौकशीबाबत तक्रार केली आहे. पतपेढीचे ठेवीदार, सभासद यांच्या हितासाठी तसेच त्यांचा कष्टाचा पैसा सुरक्षित राहण्यासाठी संस्थेच्या कारभारात पारदर्शकता आवश्यक आहे. अन्यथा संचालक एकाधिकारशाही राबवून संस्था गिळंकृत करतील. त्यामुळे संस्थेच्या अनियमित कारभाराची तात्काळ चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा झाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ॲड शिंदे यांनी दिला.

## स्व. देवानंद कायंदे यांच्या स्मृतिपित्यर्थ कावड यात्रेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : हिंदू धर्मामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान अस-लेले श्रद्धेचे प्रतीक असलेली कावड यात्रेचे आयोजन सिंदखेड राजा मतदारसंघातील देऊळगाव राजा तालुक्यातील टाकरखेड भागिले ते धोत्रा नंदई येथिल महादेव मंदिरा पर्यंत तालुक्यासह मतदार संघातील सर्व शिवभक्तासाठी भव्य कावड यात्रेचे मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात आयोजित करण्यात येत आहे.



या पवित्र कावड यात्रेच्या माध्यमातून पवित्र जल आणून भगवान शिवाला अभिषेक केला जातो.ही यात्रा धर्म, संस्कृती आणि एकात्मतेचे प्रतीक असून स्व. देवानंद कायंदे यांच्या स्मृतिपित्यर्थ ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७ वाजता भव्य कावड यात्रा आयोजित केली असून,या कावड यात्रेत जास्तीत जास्त सिंदखेड राजा मतदार संघातील शिवभक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन रवि लाड यांनी केले आहे.सदर यात्रेला देऊळगाव राजा तालुक्यातील टाकरखेड भागिले येथून सुरुवात होणार असून देऊळगाव मही, सरांबा फाटा, वाकी खुर्द फाटा मार्गे जात धोत्रा नंदई येथील महादेव मंदिरावर समारोप होणार असून, सर्व शिवभक्तांनी, तरुणांनी या पवित्र यात्रेत सहभागी व्हावे आणि आपल्या भक्तीने वातावरण भक्तिमय करावे, असे आवाहन रवि लाड मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आहे.

> **श्रद्धेचे प्रतीक असलेल्या भव्य कावड यात्रेत शिवभक्तांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे : रवि लाड**